नि.दि.दा.क्र. ३०/२०१५

नि. ७० लगत

**उलटतपास प्रतिवादी तर्फे ॲड. एस.एस.भंडारे यांचेवतीने सुरु.**

महादेव सावंत यांच्या घरापासून माझे घर ५० ते १०० फूटांवर आहे. महादेव सावंत हे माझे सख्खे चुलते होते. सदर नातेसंबंध माझ्या जबाबात का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की महादेव हे माझे चुलते असल्याने आमच्या काही जमीनी एकमेकांना लागून आहेत. अनिल महादेवराव सावंत हा माझ्या माहितीतला होता व तो पोलीस खात्यात नोकरीस होता. हे म्हणणे खरे आहे की त्याने बहुतांश त्याची नोकरी सातारा येथे केली होती. हे म्हणणे खरे नाही की तो नोकरीच्या ठिकाणी ल्हासुर्णे येथे जाणे येणे करत होता. हे म्हणणे खरे आहे की अनिल व नलिनी यांचे एकमेकांशी पटत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे लग्नानंतर एक वर्षानंतर नलिनी ही तिच्या माहेरी कोडोली येथे राहायला गेली. हे म्हणणे खरे आहे की त्यानंतर ती अनिलच्या हयातीत नांदायला आली नाही. हे म्हणणे खरे नाही की त्यांचे वैवाहिक वाद न्यायालयात होते. हे म्हणणे खरे आहे की अनिल यास दारुचे व्यसन होते व त्या व्यसनामुळे त्याची नोकरी सुटली होती. हे म्हणणे खरे आहे की नोकरी सुटल्यानंतर तो काम न करता दिवसभर दारुच्या व्यसनात असायचा. हे मला माहिती नाही की अनिल याने सुलोचना बरोबर दुसरे लग्न केले होते. हे म्हणणे खरे आहे की अनिल, सुलोचना, महादेव व सुभद्रा हे ल्हासुर्णे येथे घरी एकत्र राहत होते. हे मला माहिती नाही की अनिल यास सुलोचनाकडून सोनाली व आकाश अशी दोन अपत्ये झाली. हे मला माहिती नाही की सोनाली व आकाश हे समजते होईपर्यंत आजोबा महादेव यांच्या बरोबर राहत होते. हे म्हणणे खरे आहे की महादेव मयत झाले त्यावेळी त्यांचे वय जवळपास ९० वर्षांचे होते व सुभद्रा मयत झाली त्यांचे वय ८२ वर्ष होते. हे म्हणणे खरे आहे की सुभद्रा ही आजारी असायची. हे म्हणणे खरे आहे की महादेव व सुभद्रा हे वयस्कर लोक असल्याने त्यांना नेहमी दवाखान्यात न्यावे लागायचे. हे म्हणणे खरे आहे की गट नं. ७११ हा महादेव याने मंगलला विकण्यापूर्वी प्रविण हणमंत भिलारे यांना गहाण दिला होता. हे म्हणणे खरे आहे की गट नं. ११०६ हा महादेव याने त्यांच्या हयातीत चौव्हाण यांना विकला होता. हे म्हणणे खरे आहे की गट

नं. ११०८ हा महादेव याने त्यांच्या हयातीत शेलार यांना विकला होता. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकती त्यांनी काही लोकांची देणी देण्यासाठी, औषध पाण्यासाठी व कर्ज भरण्यासाठी विकल्या होत्या. अनिल मयत झाल्यानंतर महादेव यास मंगल व अलका या दोन मुली वारस राहिल्या. हे म्हणणे खरे आहे की महादेव याने जमीन विक्रीस काढल्या त्यावेळी मी त्यांना जमीनी मला विकत दया असे म्हणालो होतो. हे म्हणणे खरे नाही की परंतु सदर मिळकती मोजक्या पैशात मला हव्या असल्याने महादेव याने त्या मिळकती मला विकल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की महादेव व माझ्यामध्ये सन १९९६–१९९७ पासून वाद होता. हे म्हणणे खरे आहे की महादेव यास शेती करणे जमत नसल्यामुळे त्यांनी काही जमीनी गहाण दिल्या होत्या व काही जमीनी वाटयाने दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की अनिल व सुभद्रा मयत झाल्यानंतर महादेव ल्हासुर्णे येथे एकटाच राहत होता. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे अलका व मंगल या जावून येवून त्यांची देखभाल करत होत्या. हे म्हणणे खरे आहे की मंगल हिने तिच्या वडीलांना पुणे येथे नेले होते व महादेवची शेवट पर्यंत देखभाल मंगलनेच केली. हे म्हणणे खरे आहे की महादेव पुणे येथे मंगलकडे असताना मयत झाला. हे म्हणणे खरे आहे की सुभद्रा ही तिच्या शेवटच्या कालावधीत मोठया दवाखान्यात दाखल होती. हे म्हणणे खरे आहे की आई वडीलांच्या आजारपणाचा संपूर्ण खर्च मुलींनीच केला. साक्षीदार स्वतःहून सांगतो की आई मंगलकडे होती व वडील अलकाकडे होते. हे म्हणणे खरे नाही की त्यांचे स्वतःचे आजारपण, मुलाचे व बायकोचे आजारपण याच्यामुळे त्यांना पैशाची नड होती. हे म्हणणे खरे आहे की अनिल वारल्यानंतर आठ ते पंधरा दिवसांनी महादेव वारले व त्यानंतर सुभद्रा वारल्या. हे म्हणणे खरे नाही की महादेव व माझे चांगले संबंध नसल्यामुळे आमचा बोलण्याचा संबंध येत नाही.

हे म्हणणे खरे नाही की महादेव व सुभद्रा वारल्यानंतर त्यांची जमीन मला विकत घ्यायची असल्याने मी नलिनीला हा दावा दाखल करायला भाग पाडले. हे म्हणणे खरे नाही की नलिनी व माझ्यात असे ठरले आहे की तिला दाव्यात काही हिस्सा मिळाला तो तिने मला विकत दयायचा व मी तिला दाव्यात मदत करायची. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासात लिहल्याप्रमाणे सोनालीचा महादेव यांच्या कुटुंबाशी काहीही संबंध नाही,

तसेच महादेव यास आर्थिक अडचण नव्हती असे महादेव मला सांगायचे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की अलका व मंगल यांना करुन दिलेले दस्त हे पोकळ आहेत हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की अलका व मंगल यांना करुन दिलेल्या दस्ताच्या वेळी मी उपस्थित नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की सदर दस्त कधी झाले व किती रुपयांना झाले याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर दस्ताची मला काहीही कल्पना नाही. हे म्हणणे खरे नाही की नलिनीला दाव्यात मदत करायची म्हणून मी दाव्यात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

कोरेगाव **(ए. ए.पाचरणे )**

दि. १२/१२/२०२३ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कोरेगाव.